


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक २९२, मंगळवार ११ नोव्हेंबर २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये







शुभेच्छुक : समस्त पारनेरकर नागरिक | नीलेश लंके प्रतिष्ठान, पारनेर शहर | राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, पारनेर शहर

## शॉर्ट न्यूज

### शांततेत निवडणूक पार पाडावी

■ **शिर्डी :** नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक निर्णय अधिकारी माणिक आहेर यांनी सर्व राजकीय पक्ष, पदाधिकारी, इच्छुक उमेदवार, अधिकारी व कर्मचाऱ्यांना आचारसंहितेचे काटेकोर पालन करून शांततेत निवडणूक पार पाडण्याचे आवाहन केले. निवडणूक प्रक्रिया व आचारसंहितेबाबत आयोजित बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले. या बैठकीस सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सतीष दिघे, नायब तहसीलदार बाळासाहेब मुळे आणि विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### वीरगाव फाट्यात बिबट्या जेरबंद

■ **अकोले :** तालुक्यातील वीरगाव फाटा येथे प्रताप धात्रक यांच्या कुक्कुटपालन शेडमध्ये घुसून कोंबड्या खाणाऱ्या बिबट्याला वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात जेरबंद केले आहे. वन विभागाने बिबट्याला ताब्यात घेतले असून, परिसरातील नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

### अण्णांनी घेतले कायरोप्रॅक्टिक उपचार

■ **पारनेर :** ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी नुकतेच कायरोप्रॅक्टिक पद्धतीने उपचार घेतले आहेत. ही उपचार पद्धती सध्या सोशल मीडियावर ट्रेंडिंगमध्ये असून, याचे अनेक व्हिडीओ व्हायरल होत आहेत. अण्णा हजारे यांच्या कायरोप्रॅक्टिक उपचारांचा व्हिडीओ कायरोप्रॅक्टर डॉक्टरांनी त्यांच्या इंस्टाग्राम अकाउंटवर शेअर केला आहे.

### कर्मवीर कृषी महोत्सवाचे उद्घाटन

■ **कोपरगाव :** तालुक्यातील कोळपेवाडी येथे दिवंगत माजी खासदार कर्मवीर शंकरराव काळे यांच्या १३ व्या पुण्यस्मरणा निमित्त आयोजित कर्मवीर कृषी महोत्सव २०२५ चे उद्घाटन राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रेय भरणे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी बोलताना त्यांनी कर्जमाफीची तारीख जाहीर केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार अशोकराव काळे होते. आमदार आशुतोष काळे व कारखान्याचे पदाधिकारी, कर्मचारी, सभासद उपस्थित होते.

### करंजी घाटात रस्ता खचला

■ **पाथर्डी :** अहिल्यानगर-पाथर्डी मार्गावर करंजी घाटात दर्याखालील दुसऱ्या वळणाजवळ रस्त्याला मोठे भगदाड पडून एक बाजू खचली आहे. सप्टेंबरमधील अतिवृष्टीमुळे झालेल्या या नुकसानामुळे वाहतुकीला धोका निर्माण झाला असून त्या ठिकाणी एक बाजूचा रस्ता बंद करण्यात आला आहे. राष्ट्रीय महामार्ग विभागाने अद्याप दुरुस्तीची दखल घेतलेली नाही.

# शिरुर नगरपरिषद निवडणुकीतून प्रकाश धारिवाल यांची माघार

## । शिरुरच्या राजकारणात भूकंप
## । शहर विकास आघाडीही निवडणुकीबाहेर

**रांजणगाव गणपती : प्रतिनिधी**

**शिरुर नगरपरिषदेवर २००७ पासून एकहाती सत्ता गाजवणाऱ्या शिरुर शहर विकास आघाडीने यंदाच्या नगरपरिषद निवडणुकीपासून दूर राहण्याचा निर्णय घेतल्याने शिरुरच्या राजकारणात मोठा भूकंप झाल्याची चर्चा सुरु आहे. आघाडीचे प्रमुख आणि माजी नगराध्यक्ष प्रकाश धारिवाल यांनी या निर्णयाची अधिकृत घोषणा केली आहे.**






नगरपरिषद निवडणुकीचा बिगुल वाजल्यानंतर, धारिवाल यांची भूमिका काय असेल याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. शेवटी त्यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत त्यांनी स्पष्ट केले की, ''या वेळेस मी स्वत: निवडणूक लढविणार नाही आणि शिरुर शहर विकास आघाडी देखील कोणतेही पॅनल उभे करणार नाही.'' धारिवाल म्हणाले, ''वडील रसिकलाल धारिवाल यांच्या निधनानंतर व्यवसायाची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर आली आहे. व्यवसायाचा विस्तार सातहून अधिक राज्यांपर्यंत झाला आहे. त्यामुळे राजकारणाला पुरेसा वेळ देणे शक्य नाही.

### धारिवाल यांचा स्पष्ट शब्दात इन्कार

**''मी किंवा शिरुर शहर विकास आघाडी यंदाच्या नगरपरिषद निवडणुकीत उमेदवार देणार नाही आणि कोणालाही पाठिंबा देणार नाही,'' असे धारिवाल यांनी ठामपणे सांगितले.**

सर्व पक्षीय नेत्यांशी माझे चांगले संबंध आहेत, कोणाशी वैर नाही. समाजकारणाची आवड कायम असून, पुढे त्याच मार्गाने कार्यरत राहणार आहे.''

या बैठकीला माजी आमदार पोपटराव गावडे, आघाडीचे अध्यक्ष ॲड. सुभाष पवार, सचिव मनसूख गुगळे, माजी नगराध्यक्ष रवींद्र ढोबळे, नसीम खान, माजी उपनगराध्यक्ष पोपटलाल ओस्तवाल, जाकीरखान पठाण, दादा पाटील घावटे, अरुणराव घावटे, चंद्रकांत बोरा, संजय देशमुख, किरण आंबेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## वाचकांच्या लेखणीतून

### हाफ पॅन्ट



गणपतराव रेल्वे खात्यात कामाला होते. आता ते सेवानिवृत्त झाले आहेत. आता चांगलेचुंगले खायचे, आराम करायचे दिवस आले असताना त्याचा लाभ गणपतराव घेऊ शकत नाहीत. त्यांना मधुमेहाचा विकार असल्याचे डॉक्टर म्हणाले. त्यामुळे दररोज औषधपाणी, वेगवेगळ्या डॉक्टरी तपासण्या, घरात सासुसुनांची कुरबूर.
त्यामुळे गणपतराव पुरते वैतागले आहेत. अलिकडे तर गणपतराव आणि त्यांच्या पत्नीला वृद्धाश्रमात टाकण्याची घरच्यांनी तयारीही चालवली आहे म्हणे. बिच्चारे गणपतराव!
डॉक्टारांनी त्यांना गोडधोड खाणे वर्ज्य सांगितले आहे. सकाळी तासभर आणि संध्याकाळी तासभर चालण्याचा सल्ला दिला आहे.
त्रस्त गणपतराव संध्याकाळी आमच्या पेंशनर मित्रांच्या कट्ट्यावर गप्पा मारण्यासाठी येतात. गप्पाटप्पांमध्ये आपले मन रमवतात. हसत खेळत जगण्याने आयुष्य वाढते. दुःखही हलके होते. असे त्यांना कुणीतरी सांगितले आहे. ते त्यांना पटलेही आहे.
कट्ट्यावर येताना सुरुवातीला ते ट्रॅक पॅन्ट वापरीत असत. पण हल्ली हाप पॅन्टच वापरतात.
परवा गणपतराव बाहेरगावी गेले असल्याने कट्टयावर आले नव्हते. आमच्या मित्रामित्रांमध्ये त्यांचा विषय निघाला.
रघुनाथराव म्हणत होते, गणपतरावांना मानले पाहिजे. आपला मधुमेह आटोक्यात ठेवण्यासाठी वेळच्या वेळी औषधपाणी घेतात. पथ्य पाळतात. तासभर सकाळी आणि तासभर संध्याकाळी चालण्याचा नियमित व्यायाम करतात!
मी म्हणालो,
होय होय हो. म्हणूनच चालून चालून त्यांच्या फुल पॅन्टची आता हाफ पॅन्ट झाली आहे!
सगळे कट्टेकर खो खो हसत सुटले!

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहिल्यानगर

# शिक्षण अर्धवट सोडलेले विद्यार्थी पुन्हा येणार शाळेत

## । भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये मिळणार प्रवेश
## । शाळेतील समित्यांच्या बैठकीतील निर्णय



**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**हिंद सेवा मंडळाच्या ज्युनिअर कॉलेज तसेच भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये शाळा व्यवस्थापन समिती, सखी सावित्री समिती व विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समिती अध्यक्ष प्रा. ज्योती कुलकर्णी व महिला तक्रार निवारण समिती अध्यक्ष उज्वला साठे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली.**

या बैठकीत शाळेच्या विविध कार्यांचा आढावा घेण्यात आला. प्राचार्य सुनील सुसरे यांनी रात्रशाळेस इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती व कौशल्य विकास, स्वयंरोजगारासाठी सहकार्य करणारी मासूम संस्था (मुंबई) व कौशल्य विकासासाठी मदत करणाऱ्या जनशिक्षण संस्था, मिटकॉन, अरेना फाउंडेशन (मुंबई), रोटरी क्लब या संस्थाबद्दल उपस्थित सदस्यांना माहिती माहिती दिली.

रात्रशाळेस सहकार्य करणाऱ्या संस्थांचे आभार मानण्यात आले. तसेच घरच्या परिस्थितीमुळे तसेच विवाह लवकर झाल्यामुळे शिक्षण सोडलेल्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणून रात्रशाळेत प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचबरोबर महिला व विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न, शैक्षणिक सुविधा, भौतिक सोयी आणि शाळेच्या प्रगतीसाठी आवश्यक उपाययोजना यावरही सखोल चर्चा करण्यात आली. बैठकीस माजी चेअरमन डॉ. पारस कोठारी, शिक्षक प्रतिनिधी गजेंद्र गाडगीळ, ॲड. आशिष सुसरे, सुनिता गोरे, अशोक खरे आदी उपस्थित होते.

डॉ. पारस कोठारी म्हणाले, प्रपंच सांभाळून शिक्षण घेणारे विद्यार्थी आपले भवितव्य घडवत आहेत. त्यांच्या सोयीसाठी शाळेत अनेक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. आजच्या काळात शिक्षण हे समाजातील प्रत्येक घटकासाठी आवश्यक आहे. भाई सथ्था नाईट हायस्कूलने अनेक वर्षांपासून कामगार, गृहिणी, कामगार वर्गातील युवकांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य केले आहे.

रात्रशाळेच्या माध्यमातून अनेकांना नवी दिशा मिळून त्यांचे भवितव्य घडले आहे. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व्हावी यासाठी भाई सथ्था नाईट हायस्कूलमधील शिक्षक दैनंदिन ज्यादा वेळ देऊन विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याचा फायदा

ज्योती कुलकर्णी म्हणाल्या, संपूर्ण राज्यातील रात्रशाळांमध्ये भाई सथ्था नाईट हायस्कूल आघाडीवर आहे. शाळेत विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. शिक्षण हे केवळ ज्ञानार्जन नसून व्यक्तिमत्व विकासाचे माध्यम आहे. रात्रशाळेत शिकणारे विद्यार्थी मेहनती, जबाबदार असून त्यांच्या प्रगतीसाठी संस्था प्रयत्नशील आहे.

# नरनाळा पर्यटन महोत्सव १३ वर्षांनी पुन्हा सुरू होणार

## । दखल संघटनेचा पुढाकार, जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा
## । गड किल्ल्यांचा इतिहास जाणून घेण्याची संधी

**अकोला : प्रतिनिधी**

**पर्यटक, निसर्गमित्र व वनप्रेमींच्या जिव्हाळ्याचा विषय असलेला नरनाळा पर्यटन महोत्सव पुन्हा सुरू होण्याचे संकेत प्राप्त झाले आहेत. याबाबत दखल संघटनेतर्फे जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. त्यानंतर आता एक समिती गठित होणार असून, हा रखडलेला मुद्दा मार्गी लागणार आहे.**

अकोट तालुक्यात वसलेले जिल्ह्याचे एकमेव पर्यटन स्थळ नरनाळा किल्ला आहे. अतिशय निसर्गरम्य वातावरणात सातपुड्याच्या रांगेत असलेले आकर्षक व कलात्मकरीत्या परिपूर्ण किल्ला आहे. पूर्ण काम काळ्या दगडात केलेले आहे. या नरनाळा किल्ल्याला चार प्रकारचे प्रवेशद्वार असून, पहिला दिल्ली दरवाजा, दुसरा शिरपूर दरवाजा, तिसरा अकोट दरवाजा व चौथा शहानूर दरवाजा, असे भव्य आकाराचे दगडाचे कोरीव काम केलेल्या शिलांना रचून यांची निर्मिती करण्यात आली आहे. दरम्यान गत १३ वर्षांपासून सतत दरवर्षी नरनाळा महोत्सवाचे आयोजन करण्यात यावे या आशयाचे निवेदन 'दखल'चे संस्थापक प्रदीप गुरूखुद्दे प्रशासनाला देत आहेत. आता विद्यमान जिल्हाधिकारी वर्षा मीना यांची भेट घेतली. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा मीना, प्रदीप



गुरूखुद्दे, अनिता कवडे, डॉ. चंद्रकांत पनपालीया, ठाकूरदास चौधरी, डॉ. छाया देशमुख, सचिन अहिर, पंकज मणियार यांनी चर्चेत सहभाग नोंदवला. नरनाळा महोत्सवाबाबत जिल्हाधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

नरनाळा पर्यटन महोत्सव जानेवारी २०२६ मध्ये आयोजन होण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने महसूल , वनविभाग, पाटबंधारे विभाग तथा संबंधित स्वयंसेवी संघटनांनी समिती गठित होणार आहे.

नरनाळा किल्ल्याच्या रस्त्याची दुरुस्ती तातडीने करण्यात येणार असून किल्ल्यावर फेरफटका मारण्यासाठी सफारी, बोटींग, हत्ती सफारी, उंट सफारी, ट्रॅकिंग, पेय-पदार्थाचे स्टॉल उभारले जाणार आहेत. छायाचित्र स्पर्धेसह विविध स्पर्धांचेही आयोजन करण्यात येणार आहे. अशी आहे: रचना किल्ल्याच्या दरवाजात एक महाकाली दरवाजा आहे. दरवाजा आकाराने मोठा आहे. हा महाकाली दरवाजा कलेचा उत्कृष्ट नमुना असून दरवाजा गोंड आणि मुस्लिम राज्यघटना दर्शवतो. त्यावरील नक्षीकाम सुंदर आहे. या किल्ल्यावर अष्टधातूंच्या तोफ आहेत. त्यातील सर्वांत मोठी नवनाज तोफ सक्कर तलावाजवळ पहावयास मिळते. त्या तोफेची लांबी नऊ गज असून, त्याकाळातील ती सर्वांत लांब तोफ होती. इतर तोफ दक्षिण भागाकडे असून त्याही पहावयास मिळतात. किल्ल्याच्या वरील भागात तलाव असून तो निसर्गाचा एक चमत्कारच आहे. त्या तलावाला सक्कर तलाव असे म्हणतात. त्या तलावाचे पाणी गोड आहे.

सन २००७मध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी श्रीकर परदेशी यांनी नरनाळा महोत्सवासाठी पुढाकार घेतला होता. नियोजन केल्यानंतर २००९ मध्ये नरनाळा पर्यटन महोत्सव सुरू झाला. या आयोजनाला अकोल्यासह अन्य जिल्ह्याबाहेरील नागरिकांनीही चांगला प्रतिसाद दिला होता. मात्र, १३ वर्षांपूर्वी हा नरनाळा महोत्सव बंद करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील कलावंत तसेच पर्यटकांचा हिरमोड झाला.

# रूपाली पाटलांना पक्षाकडून धक्का

## अजितदादांसोबतची भेट ठरली व्यर्थ । राष्ट्रवादीकडून प्रवक्त्यांची नवीन यादी जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मोठा निर्णय घेत सर्व जुन्या प्रवक्त्यांच्या नियुक्त्या रद्द केल्या असून, नवीन चेहऱ्यांना प्रवक्तेपदाची जबाबदारी सोपवली आहे. या नव्या यादीत गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या रूपाली ठोंबरे पाटील यांचे नाव वगळण्यात आले आहे. त्यामुळे त्यांना पक्षाकडून मोठा धक्का बसला आहे. फलटण प्रकरणावर राष्ट्रवादी नेत्या रूपाली चाकणकरांवर केलेली त्यांची टीका अखेर त्यांच्याच गळ्यात पडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.यासोबतच आमदार अमोल मिटकरी यांनाही प्रवक्तेपदावरून हटवण्यात आले आहे.**

राष्ट्रवादीच्या नव्या नियुक्त्यांनुसार अनिल पाटील, चेतन तुपे, सना मलिक, हेमलता



पाटील, राजीव साबळे, सायली दळवी, रूपाली चाकणकर, आनंद परांजपे, राजलक्ष्मी भोसले, प्रतिभा शिंदे, प्रशांत पवार, शशिकांत तरंगे, ब्रिजमोहन श्रीवास्तव, अविनाश आदिक, सुरज चव्हाण, विकास पासलकर आणि श्याम सनेर या नेत्यांची प्रवक्तेपदी निवड करण्यात आली आहे.

रूपाली ठोंबरे आणि रूपाली चाकणकर वादाचे पडसाद

फलटण येथील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात राष्ट्रवादी नेत्या व राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी पोलिसांची बाजू घेतल्याने पक्षातील महिला नेत्यांनीच त्यांच्यावर टीका केली होती. या नेत्यांमध्ये राष्ट्रवादीच्या रूपाली ठोंबरे यांचाही समावेश होता. त्यांनी चाकणकरांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली होती.हा वाद वाढल्यानंतर पक्षाने रूपाली ठोंबरे यांना नोटीस बजावून स्पष्टीकरण मागितले होते. त्यानंतर त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली होती. त्यामुळे प्रकरण शांत झालं, असे वाटत असतानाच पक्षाने त्यांचं नाव नव्या प्रवक्त्यांच्या यादीतून वगळून सर्वांनाच धक्का दिला आहे.

ठोंबरे म्हणाल्या, ''अजून माहिती घेत आहे''

यासंदर्भात रूपाली ठोंबरे म्हणाल्या, ''मी आज पुण्याच्या बाहेर प्रवासात आहे, त्यामुळे माझा संपर्क होऊ शकला नाही. पक्षाने आज नव्याने प्रवक्त्यांची नेमणूक केली असून, त्यात माझ्यासह आमदार अमोल भाऊ मिटकरी, वैशालीताई नागवडे यांची नावे नाहीत. आम्ही येऊ घातलेल्या निवडणुकांना सामोरे जाण्यास सज्ज आहोत आणि पक्षाचे काम जोमाने सुरू ठेवणार आहोत. या यादीबाबत अजितदादांना कल्पना आहे का, याची मी माहिती घेत आहे. लवकरच सविस्तर बोलेन,'' असे त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, अजित पवार यांच्याशी झालेल्या भेटीनंतर त्यांचं प्रवक्तेपद कायम राहील, अशी अपेक्षा होती. मात्र आता त्यांची उचलबांगडी झाल्याने रूपाली ठोंबरे पुढे कोणता निर्णय घेणार, याबाबत राजकीय वर्तुळात नव्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

# ऑपरेशन लोटस अनसक्सेसफूल !

## महायुतीच्या घोडेबाजाराला चपराक । डॉ. विद्या कावरे पारनेरच्या नगराध्यक्षा । महाविकास आघाडीची सर्व ११ मते शाबूत । खासदार नीलेश लंके यांची रणनीती ठरली निर्णायक

पारनेर : विशेष प्रतिनिधी

पारनेर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदाची निवडणूक म्हणजे एका शहरांतर्गत राजकीय लढाई नव्हे, तर ती दोन मोठ्या राजकीय विचारप्रवाहांची चुरस होती. एका बाजूला महाविकास आघाडी  खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली संघटित, सुसंयमित, आणि एकदिलाने उभा असलेला गट. दुसऱ्या बाजूला महायुती  भाजपच्या नेतृत्वाखालील आक्रमक मोहीम आणि ''ऑपरेशन लोटस''चा प्रयत्न !   ''सत्तेचा मोह, आमिषांचा मळभ आणि फोडाफोडीची राजकारणं. यावर निष्ठा, ऐक्य आणि नेतृत्वाची छाप जडली.'' महाविकास आघाडीच्या उमेदवार डॉ. विद्या बाळासाहेब कावरे यांनी ११ विरुद्ध ६ मतांनी निर्णायक विजय मिळवत पारनेर नगराध्यक्षपदी त्यांची निवड झाली. विरोधी भाजप उमेदवार अशोक चेडे यांना पराभवाचा सामना करावा लागला.



### महायुतीचे ऑपरेशन अपयशी

सत्ताधारी नगराध्यक्ष नितीन अडसूळ यांच्या राजीनाम्याने या निवडणुकीला रंग चढला. महायुतीने तातडीने ''ऑपरेशन लोटस''ची रणनीती आखली.  महाविकास आघाडीच्या नगरसेवकांना आकर्षित करून सत्ता आपल्या ताब्यात आणण्याचा प्रयत्न सुरू झाला.या संदर्भात लाखो रुपयांच्या ऑफर, दबावाचे प्रयत्न, तसेच ''संबंधांमार्फत संपर्क'' असे सर्व मार्ग वापरले गेले.मात्र महाविकास आघाडीचे नगरसेवक त्यास बाधले नाहीत. खासदार नीलेश लंके यांनी स्वतः या घडामोडींवर नियंत्रण ठेवले. त्यांच्या निर्देशानुसार महाविकास आघाडीचे सर्व नगरसेवक सहलीवर म्हणजेच ''राजकीय सेफ हाऊस''मध्ये गेले. त्या सहलीचा उद्देश स्पष्ट होता की, घोडेबाजाराला तोंड देणे आणि आपली एकजूट अबाधित ठेवणे.

### सहलीवर गेलेल्या नगरसेवकांचे संरक्षण, रणनिती

या सहलीदरम्यान नीलेश लंके प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष कारभारी पोटघन यांनी आघाडीच्या नगरसेवकांना एकत्र ठेवण्याचे काम हाती घेतले. पोटघन यांनी विरोधकांचे संपर्क पूर्णतः रोखले, संवादाचे सूत्र हातात ठेवले आणि दररोजच्या बैठका घेत नगरसेवकांचा आत्मविश्वास टिकवला. नगराध्यक्ष नितीन अडसूळ, गटनेते योगेश मते, राष्ट्रवादीचे अर्जुन भालेकर, तसेच शिवसेनेचे राजू शेख यांनी सातत्याने समन्वय साधत गट विखुरू दिला नाही. महायुतीकडून आमिषे मिळाल्यानंतरही प्रत्येक नगरसेवकाला प्रत्यक्ष संपर्क साधून ''आपली भूमिका, आघाडीचा धर्म आणि नीलेश लंके यांचे नेतृत्व'' यावर ठाम राहण्यास प्रवृत्त केले.या रणनीतीतूनच या निवडणुकीचा मूक पण प्रभावी विजयाचा पाया.

### मतदान प्रक्रिया आणि निकाल

सोमवार, १० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या आदेशानुसार विशेष सभा घेण्यात आली. उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर पीठासीन अधिकारी होते. हात वर करून मतदान करण्यात आले. त्यात डॉ. विद्या कावरे यांना ११ मते तर अशोक चेडे यांना ६ मते मिळाली.  निकाल जाहीर होताच सभागृहाबाहेर गुलालाची उधळण आणि ''खासदार नीलेश लंके जिंदाबाद'' अशा घोषणा सुरू झाल्या.कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी, डीजे आणि मिरवणुकीतून विजयाचा उत्सव साजरा केला.

### नीलेश लंके यांच्या संघटन कौशल्याची प्रचिती

या निवडणुकीने एक गोष्ट निर्विवाद ठरवली की,  ''पारनेर तालुक्यातील राजकीय समीकरणे अजूनही नीलेश लंके यांच्या भोवतीच फिरतात.'' महाविकास आघाडीच्या नगरसेवकांची एकजूट, त्यांचे सार्वजनिक शिस्तबद्ध वर्तन, आणि कोणत्याही आमिषांना न जुमानण्याची ताकद ही सर्व लंके यांच्या नेतृत्वशैलीचे प्रतिबिंब होती.महायुतीकडून ''ऑपरेशन लोटस'' यशस्वी झाले असते, तर तालुक्यातील आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका महाविकास आघाडीसाठी धोकादायक ठरल्या असत्या.मात्र या विजयाने त्या निवडणुकांसाठी आघाडीच्या आत्मविश्वासाचा पाया अधिक मजबूत केला.

### ''सर्वांचा विश्वास, सर्वांसाठी विकास''

''खा. नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली आहे. महाविकास आघाडीच्या सर्व नगरसेवकांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता मला मत दिले. त्यांचा विश्वास ठेवून शहराचा विकास करणे हेच आपले उद्दिष्ट आहे.''

डॉ. विद्या कावरे
नवनिर्वाचित नगराध्यक्ष

### महायुतीकडून प्रतिष्ठा पणाला

महायुतीकडून भाजपने प्रतिष्ठेचा प्रश्न म्हणून ही निवडणूक लढवली.स्वतः खा. डॉ. सुजय विखे यांनी या लढतीकडे लक्ष ठेवले होते.मात्र, ज्या शिस्तीने आघाडीने नगरसेवकांना एकत्र ठेवले, त्या पातळीवर महायुतीचे गणित जुळले नाही.त्यांच्या प्रत्येक चालीला आघाडीने वेळेवर उत्तर दिले.

### कावरे परिवाराचा सन्मान आणि  इतिहासाचे नवे पान

पारनेरमध्ये अनेक वर्षांपासून सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असलेल्या कावरे परिवाराला आता नगराध्यक्षपदाचा सन्मान प्राप्त झाला आहे. पूर्वी चंद्रकांत कावरे यांनी ग्रामपंचायतीत उपसरपंच म्हणून काम केले होते. त्यांच्या वारशाला आता डॉ. विद्या कावरे यांनी नव्या पिढीचा स्पर्श दिला आहे.शहराच्या प्रथम नागरिकपदी बसून त्यांनी महिलांच्या नेतृत्वाचे नवे उदाहरण निर्माण केले आहे.

### पोलिसांचा चोख बंदोबस्त

या निवडणुकीच्या राजकीय तापमानाचा विचार करून पोलिसांनी नगरपंचायत कार्यालय परिसरात कडक बंदोबस्त तैनात केला होता. वरिष्ठ अधिकाऱ्यांसह मोठ्या संख्येने पोलीस उपस्थित राहून कोणतीही अनुचित घटना घडू दिली नाही. संपूर्ण मतदान आणि निकाल प्रक्रिया पूर्ण शांततेत, शिस्तीत आणि पारदर्शकपणे पार पडली.

### ऑपरेशन लोटस अनसक्सेसफूल

भाजप उमेदवार अशोक चेडे यांच्या माध्यमातून पारनेरमध्ये ''ऑपरेशन लोटस''ची चाचपणी झाली. महाविकास आघाडीतील नगरसेवकांना आकर्षित करून सत्तांतर घडवून आणण्याची रणनीती राबवली गेली होती. मात्र, एकही नगरसेवक गळाला न लागल्याने हे ऑपरेशन बारगळले.भाजपच्या या प्रयत्नांचे अपयश म्हणजे फक्त निवडणुकीचे नाही, तर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वीची राजकीय चाचणी अपयशी ठरली आहे.

### निष्ठेचा विजय आणि शिस्तीची शिकवण

''राजकारणात पैसा नव्हे, विश्वास आणि निष्ठाच टिकते.'' महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी याच वचनाचा प्रत्यय दिला. आमिषांची रास, दबावाचे डोंगर असूनही त्यांनी नेतृत्वावर विश्वास ठेवला. या निष्ठेचा प्रभाव पुढील सार्वत्रिक निवडणुकांत दिसेल, ''नगरसेवकांनी दाखविलेली निष्ठा आणि शिस्त ही पारनेर तालुक्याच्या राजकारणाची नवी ओळख ठरेल.''

खा. नीलेश लंके, लोकसभा सदस्य

---

# सामाजिक कार्यकर्त्यांच्या कार्याचा गुणाकार व्हावा

## अण्णा हजारे यांचे प्रतिपादन । अण्णा हजारे  पुरस्कार सोहळा उत्साहात



राळेगणसिद्धी : प्रतिनिधी

**''आज ज्यांना पुरस्कार मिळाले आहेत, त्यांच्या कार्याचे मोल पैशात मोजता येत नाही. त्यांच्या कामाचा गुणाकार समाजात व्हावा, हाच या सन्मानाचा खरा उद्देश आहे,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी केले. राळेगणसिद्धी येथे 'अण्णा हजारे सामाजिक गौरव पुरस्कार वितरण सोहळा' रविवारी (दि. ९) हजारे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लेखक सुरेशचंद्र वारघडे अध्यक्षस्थानी होते.**

हजारे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ''आपल्याला मिळालेल्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांच्या रकमेचा उपयोग समाजकार्यात केला पाहिजे, म्हणूनच मी ही संकल्पना राबवली आहे. या निधीतून प्रत्येक वर्षी सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा गौरव केला जाईल.''

हजारे यांनी स्थापलेल्या 'स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी न्यासा'त आजपर्यंत सुमारे १ कोटी ६७ लाख रुपये जमा झाले असून, त्या निधीवरील व्याजातून हे पुरस्कार दरवर्षी दिले जाणार आहेत.

या प्रसंगी आमदार काशिनाथ दाते म्हणाले, ''अण्णा हजारे यांच्या कार्यातून आणि आज सन्मानित झालेल्या कार्यकर्त्यांच्या वाटचालीतून समाजातील प्रत्येकाने प्रेरणा घ्यावी. सामाजिक काम हे पैशात मोजता येत नाही, ते मनाने मोठे असते.''

कार्यक्रमास आमदार काशिनाथ दाते, विनायक देशमुख, गणेश शेळके, विश्वनाथ कोरडे, राहुल शिंदे, उद्योजक सुरेश पठारे, सरपंच जयसिंग मापारी, कल्पना इनामदार, दगडू मापारी, वसंत चेडे, लाभेष औटी, दत्ता आवारी, पोलीस निरीक्षक संतोष खेडकर, मारुती भापकर, श्याम असावा, कैप्टन वराळ, आणि मेजर पोटघन आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक राजाराम गाजरे यांनी केले, सूत्रसंचालन रमेश पठारे व सुभाष पठारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन जयसिंग मापारी यांनी मानले.

**पुरस्कारार्थ्यांचा गौरव**

या वर्षीच्या अण्णा हजारे सामाजिक गौरव पुरस्कारांचे विजेते पुढीलप्रमाणे : प्रथम पुरस्कार: माऊली सेवा प्रतिष्ठाण, अहिल्यानगर -अध्यक्ष डॉ. राजेंद्र धामणे आणि डॉ. सुचेता धामणे,  द्वितीय पुरस्कार: आई संस्था (बालग्राम परिवार), गेवराई (जि. बीड) -अध्यक्ष संतोष गर्जे, तृतीय पुरस्कार: सावली केअर सेंटर, कोल्हापूर  अध्यक्ष किशोर देशपांडे, चतुर्थ पुरस्कार: उचल फाऊंडेशन, शेवगाव- अध्यक्ष सचिन खेडकर.प्रत्येक पुरस्कारात मानपत्र, सन्मानचिन्ह आणि अनुक्रमे दोन लाख, दीड लाख व एक लाख रुपयांची रोख रक्कम देण्यात आली.

# राष्ट्रवादीला सन्मानजनक जागा द्या !

## । मंत्री नरहरी झिरवाळ यांची अपेक्षा । अहिल्यानगरला पक्षाचा मेळावा



अहिल्यानगर : प्रतिनिधी

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा महायुतीत समावेश केवळ मुस्लिम मते वळविण्यासाठी वापरला जातो, अशी छुपी चर्चा नेहमीच सुरू असते. आज या चर्चेला प्रत्यक्ष उत्तर देताना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री नरहरी झिरवळ यांनी महायुतीतील सहकाऱ्यांनाच ठणकावले.**

झिरवळ म्हणाले, ''मुस्लिम मतदार भाजपला मते देत नाहीत. त्यामुळे मुस्लिम बाहुल भागातील जागा राष्ट्रवादी काँग्रेसला सोडल्या जातात. मात्र, असे चालणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुती होणार असेल, तर त्यात राष्ट्रवादी काँग्रेसला सन्मानजनक जागा मिळाल्या पाहिजेत,'' अशी स्पष्ट अपेक्षा झिरवळ यांनी जाहीरपणे व्यक्त केली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी पक्षाने मंत्री नरहरी झिरवळ यांची अहिल्यानगरचे संपर्कप्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. त्यानुसार त्यांनी सोमवारी नगरला येऊन पक्षाचा मेळावा घेतला. या मेळाव्यास आमदार संग्राम जगताप, आमदार काशिनाथ दाते, जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, माजी आमदार चंद्रशेखर घुले, अरुण तनपुरे, पणन महासंघाचे अध्यक्ष दत्ता पानसरे, जिल्हा कार्याध्यक्ष संजय कोळगे, शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, महिला जिल्हाध्यक्ष अशा निंबाळकर, युवती प्रदेशाध्यक्ष संध्या सोनवणे, ज्येष्ठ नेते घनश्याम शेलार उपस्थित होते.

**राष्ट्रवादी काँग्रेसला सन्मानजनक जागा मिळाव्यात**

यावेळी झिरवळ म्हणाले की, ''ही निवडणूक स्वबळावर लढवायची की महायुती करून लढवायची, यासंबंधीचा निर्णय अद्याप झालेला नाही. मात्र, कार्यकर्त्यांनी दोन्ही तयारी ठेवावी. महायुती झाली, तर राष्ट्रवादी काँग्रेसला सन्मानजनक जागा मिळाव्यात. ज्या ठिकाणी आमची ताकद आहे, त्या ठिकाणी आम्हाला जागा मिळाव्यात, अशीच अपेक्षा आमची आहे.''ते पुढे म्हणाले, ''मुस्लिम मतदार भाजपला मते देत नाहीत म्हणून त्या जागा राष्ट्रवादी काँग्रेसला द्यायच्या, असे चालणार नाही. अद्याप महायुतीचा निर्णय झालेला नाही. त्यामुळे कार्यकर्त्यांनी संयम ठेवून काम करावे. जे पक्ष सोडून गेले ते पुन्हा निवडून येत नसतात. स्वार्थापोटी जे बाहेर गेले त्यांची फजिती झालेली आपण यापूर्वीही पाहिली आहे. म्हणून उमेदवारी कोणालाही मिळो, कार्यकर्त्यांनी पक्षाचे काम निष्ठेने करावे,'' असे आवाहन झिरवळ यांनी केले.

**उमेदवारी देताना हाच निकष लावला जावा**

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, ''पक्षाच्या वरिष्ठांनी स्थानिक पातळीवर पक्षाची ताकद पाहून महायुती आणि जागा वाटपाचा निर्णय घ्यावा. उमेदवारी देताना हाच निकष लावला जावा. महायुतीच्या माध्यमातून राज्यात चांगले काम होत आहे. त्याचा फायदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना होणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात सर्व ठिकाणी पक्षाने जोरदार तयारी केली आहे. शहरात तर आम्ही तयार आहोतच, बाहेरही मदत लागली तर त्यासाठीही तयार आहोत,'' असेही जगताप म्हणाले.

# कान्हूर पठारात ‘पुत्र कामेष्टी’ला उदंड प्रतिसाद

**| स्त्रीजीवनाच्या वेदना मांडणारे प्रभावी सादरीकरण | ‘छबू’च्या भूमिकेने महिलांच्या डोळ्याच्या कडा पाणवल्या**

कान्हूर पठार : प्रतिनिधी

ग्रामीण संस्कृती, पारंपरिक कलाविष्कार आणि सामाजिक संदेश यांचा सुरेख मिलाफ असलेले श्रीराम नाट्य मंडळ निर्मित ‘पुत्र कामेष्टी’ हे नाटक कान्हूर पठार येथे रंगले. रंगमंचावर साकारलेल्या जिवंत अभिनयाला रसिकांनी उदंड दाद देत सभागृह गजबजून टाकले.



### उद्घाटनात जेष्ठ रंगकर्मी व ग्रामनेते एकत्र

नाट्यप्रयोगाचे उदघाटन जेष्ठ रंगकर्मी लतीफभाई इनामदार आणि सरपंच संध्याताई ठुबे यांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आले. श्रीराम नाट्य मंडळातील जुने व नवे कलाकार या निमित्ताने एकत्र आले होते. जुन्या आठवणींनी भरलेला हा सोहळा एक प्रकारे कान्हूर पठारच्या नाट्य परंपरेचा पुनर्जन्मच ठरला.

### ‘छबू’च्या भूमिकेत सोनाली वैद्य यांचा अभिनय झळाळला

नाटकात स्त्री जन्माची व्यथा प्रभावीपणे मांडताना अभिनेत्री सोनाली वैद्य यांनी साकारलेली छबू ही भूमिका प्रेक्षकांच्या मनात घर करून गेली. त्यांच्या अभिनयाने अनेक महिलांच्या डोळ्याच्या कडा पाणवल्या. तर रशीद इनामदार यांनी साकारलेली काशिनाथ ही भूमिका जेष्ठ कलाकार रंगकर्मी म्हणून नाटकाची ताकद ठरली.

### कलाकारांच्या एकसंध कामगिरीने नाटकाला जीव

स्वानंद ठुबे, प्रा. तुषार ठुबे, अरविंद लोंढे, हरिदास वाघमारे, संतोष ठुबे, विनोद बागले, दत्तात्रय ठुबे यांच्या भूमिकांनी प्रेक्षकांना क्षणभरही कंटाळा येऊ दिला नाही. ग्रामीण कथानकात त्यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखा इतक्या जिवंत वाटल्या की प्रेक्षक नाटकाच्या शेवटपर्यंत खिळून बसले.

### नेपथ्य आणि संगीताची सुंदर सांगड

नाटकाचे नेपथ्य रघुनाथ मेहेत्रे व बाळकृष्ण व्यवहारे यांनी प्रभावीपणे उभारले. प्रकाश योजना संजय व्यवहारे व प्रशांत बागले यांनी केली, तर संगीताची माळ कल्पेश शिंदे यांनी गुंफली. या सर्वांनी मिळून नाटकाचे दृश्य व श्राव्य सौंदर्य खुलवले.

### ग्रामीण भागातील रंगभूमीला नवे बळ

या प्रयोगाला पठार व पंचक्रोशीतील असंख्य नाट्यप्रेमी उपस्थित होते. भास्कर पोपलघट, संभाजी ठुबे, कैलास लोंढे या मार्गदर्शक मंडळींनी नाटक यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. ग्रामस्थांनी मत व्यक्त करताना सांगितले की, ‘‘सोशल मीडियाच्या आहारी गेलेली तरुण पिढी अशा नाट्यप्रयोगांमुळे पुन्हा रंगभूमीकडे वळेल.’’

### नाट्यसंस्कृतीचा दीप प्रज्वलित

‘पुत्र कामेष्टी’ने कान्हूर पठारच्या रंगमंचावर पुन्हा एकदा नाट्यसंस्कृतीचा दीप प्रज्वलित केला आहे. ग्रामीण भागातील कलावंतांच्या जिद्दीने रंगभूमीचे तेज अधिक उजळले आहे.

# म्हसणे फाट्यावर वाहतूक सिग्नल बसवा

**खासदार निलेश लंके यांची मागणी**

पारनेर : प्रतिनिधी



अहिल्यानगरपुणे महामार्ग हा जिल्ह्यातील सर्वाधिक वर्दळीचा मार्ग ठरत असून, या मार्गावरील म्हसणे फाटा परिसर गंभीर वाहतूक समस्येचा केंद्रबिंदू बनला आहे. दररोज हजारो वाहनांची वर्दळ, नियंत्रणाची कमतरता आणि वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर खासदार निलेश लंके यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वाहतूक सिग्नल बसविण्याची मागणी केली आहे.

### स्थानिक नागरिकांचीही मागणी

या भागातील नागरिक, व्यापारी व प्रवासी संघटनांनीही गेल्या काही महिन्यांपासून या विषयावर सातत्याने आवाज उठवला आहे. दर आठवड्याला होणाऱ्या अपघातांमुळे जनतेत भीतीचे वातावरण आहे.‘‘दररोज सिग्नल नसल्यामुळे वाहनं अराजकपणे धावत असतात. शाळकरी मुलांना रस्ता ओलांडताना जीव मुठीत घेऊन चालावे लागते,’’ अशी भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली.त्यामुळे खासदारांनी या मागणीस संस्थात्मक रूप देऊन विभागाकडे अधिकृत प्रस्ताव पाठविल्याने नागरिकांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत आहे.

### ग्रामीण भागाला जोडणारा प्रमुख चौक

अहिल्यानगरपुणे हा केवळ जिल्ह्याचाच नव्हे तर राज्याच्या दृष्टीने महत्त्वाचा राष्ट्रीय महामार्ग आहे. या महामार्गावर म्हसणे फाटा हे ठिकाण शहराच्या मध्यवर्ती भागाशी ग्रामीण भागाला जोडणारे प्रमुख चौक आहे. दररोज सकाळसंध्याकाळच्या गर्दीच्या वेळी येथे वाहनांची संख्या काही हजारांच्या घरात असते. मात्र, सिग्नल व्यवस्था नसल्यामुळे वाहतुकीचे नियंत्रण पूर्णतः कोलमडले आहे. अनेकदा चार दिशांतून वाहने एकाच वेळी रस्ता ओलांडण्याचा प्रयत्न करत असल्याने वाहतुकीची कोंडी, आणि अपघातांची शक्यता वाढली आहे.

### शाळकरी विद्यार्थी, नागरिकांच्या जीवाला धोका

या चौकातून अनेक शाळा आणि महाविद्यालयांकडे जाणारी वाहतूक होते. त्यामुळे विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना रस्ता ओलांडताना मोठा धोका निर्माण झाला आहे. वाहनांच्या वेगामुळे आणि सिग्नल नसल्याने पादचारी अपघातांच्या घटना वाढण्याची शक्यता वाढली आहे. ‘‘नागरिकांना सुरक्षितता देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे,’’ असे नमूद करत खासदार लंके यांनी या ठिकाणी वाहतूक सिग्नल बसविण्याची गरज ‘तातडीची आणि अपरिहार्य’ असल्याचे अधोरेखित केले आहे.

### बांधकाम विभागाला खा. लंके यांचे पत्र

बीनया विषयावर खासदार निलेश लंके यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांना पत्राद्वारे मागणी केली आहे. पत्रात म्हटले आहे की, ‘‘अहिल्यानगरपुणे महामार्गावरील म्हसणे फाटा येथे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतूक नियमनासाठी सिग्नल बसविण्याची आवश्यकता आहे. स्थानिक पोलीस विभाग, आणि आपल्या विभागामार्फत संयुक्त समन्वयातून तातडीने निर्णय घ्यावा.’’तसेच, सदर प्रस्तावावर त्वरित कार्यवाही करून अहवाल सादर करावा, अशी अपेक्षा त्यांनी पत्राद्वारे व्यक्त केली आहे.

### संयुक्त यंत्रणा स्थापन करा

खासदार लंके यांनी पत्रात स्पष्ट केले आहे की, या प्रस्तावावर पोलीस प्रशासन, आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने संयुक्त समन्वयातून निर्णय घ्यावा, म्हणजे सिग्नल बसविण्याबरोबरच वाहतूक मार्गांचे नियोजन, फलक, झेब्रा क्रॉसिंग आणि पादचारी सुविधा याचाही समावेश करता येईल.तसेच, रस्त्याच्या कडेला असलेल्या व्यापारी आस्थापनांच्या अनियंत्रित पार्किंगवर देखील नियंत्रण ठेवण्याची गरज असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले आहे.

# मनोज मुंगसे कडूसच्या विकासाचे शिल्पकार

**अथक प्रयत्न आणि गावाच्या प्रगतीची अखंड धडपड**



कडूस : प्रतिनिधी

गावाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याची खरी जबाबदारी सरपंचाच्या खांद्यावर असते. ही जबाबदारी निष्ठेने पार पाडत कडूस गावाचे रूप पालटणारे नाव म्हणजे सरपंच मनोज मुंगसे. खासदार सुजय विखे पाटील आणि राहुल शिंदे पाटील यांच्या विश्वासू नेतृत्वात काम करताना मुंगसे यांनी गाव विकासाचे नवे मापदंड प्रस्थापित केले आहेत. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त गावकऱ्यांकडून ‘‘विकासाचे शिल्पकार’’ म्हणून गौरव केला जात आहे.

### गाव विकासासाठी अखंड झटणारा सरपंच

मनोज मुंगसे यांनी सरपंच पदाची सूत्रे हातात घेतल्यानंतर कडूस गावाने खऱ्या अर्थाने विकासाचा वेग अनुभवला. ग्रामसेवकासह सुसंवाद साधत, सर्व घटकांना सहभागी करून घेत गावाचा चेहरामोहरा बदलला. गेल्या पाच वर्षांपासून गावातील पायाभूत सुविधा, शिक्षण, पाणीपुरवठा आणि सामाजिक विकास या सर्व क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

### जलजीवन मिशनमुळे कायमस्वरूपी पाण्याचा तोडगा

गावातील सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या समस्येवर मनोजभाऊंनी जलजीवन मिशन योजना मंजूर करून कायमस्वरूपी उपाययोजना केली. प्रत्येक वाड्यावस्त्यांपर्यंत नळजोडणी पोहचवून कडूसला ‘‘निर्भेळ जलपुरवठा गाव’’ बनवले.

### आधुनिक पायाभूत सुविधा

रस्ते, ड्रेनेज, पाइपलाईन आणि स्ट्रिटलाईट या मूलभूत सुविधांसाठी त्यांनी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. म्हसाणभूमी परिसरात पेव्हिंग ब्लॉक व सभामंडप उभारणीसह गाव सुशोभित करण्याचे काम पूर्णत्वास गेले. वाड्यावस्त्यांपर्यंत स्ट्रीट लाईट पोहोचवून सुरक्षित वातावरण निर्मिती केली.

### शिक्षण क्षेत्रातही आदर्श पायंडा

झेडपी शाळेसाठी तब्बल ३० ते ४० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. यामुळे विद्यार्थ्यांना अत्याधुनिक शिक्षणसुविधा मिळाल्या. संगणक, फर्निचर आणि डिजिटल साधनसामग्रीसह शाळेचा चेहरा बदलून टाकला.

### वाढदिवसानिमित्त ग्रामस्थांचा गौरव

गावातील नागरिक, कार्यकर्ते आणि युवा वर्ग आज ‘‘आमचा सरपंच आमचा अभिमान’’ या भावनेने त्यांचा वाढदिवस साजरा करत आहेत. मनोजभाऊ मुंगसे यांच्या नेतृत्वाखाली कडूस गाव भविष्यात आणखी प्रगती साधेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

### वंचित घटकांसाठी खरा ग्रामदूत

मनोजभाऊ मुंगसे हे केवळ विकासकामांपुरते मर्यादित न राहता समाजातील वंचित घटकांच्या उत्थानासाठी झटतात. शासनाच्या विविध योजना तळागाळापर्यंत पोहोचवून गरीब कुटुंबांना दिलासा दिला. त्यांच्या कार्यशैलीत प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि जनसंपर्काचा सशक्त संगम दिसतो.

### नेतृत्वावर विश्वास

खासदार सुजय विखे पाटील आणि राहुल शिंदे पाटील यांच्या कार्यपद्धतीचा प्रभाव मुंगसे कामात स्पष्टपणे जाणवतो. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कडूस गाव आज विकासाच्या शिखरावर पोहोचले आहे.

# शिक्षणक्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा गौरव

**न्यू इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्य, कोऑर्डिनेटर व शिक्षिकेला ‘लाईफ टाईम अचिव्हमेंट’ पुरस्कार**

निघोज : प्रतिनिधी




शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, निघोज येथील प्राचार्य श्री. डायस , कोऑर्डिनेटर सौ. मोनिका आणि शिक्षिका सौ. मीनाक्षी यांना प्रतिष्ठित ‘‘लाईफ टाईम अचिव्हमेंट अवॉर्ड’’ ने गौरविण्यात आले. हा सन्मान इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड तर्फे मंगळवार, दि. ४ नोव्हेंबर रोजी नवी मुंबईतील विष्णुदास भावे नाट्यगृह येथे आयोजित भव्य समारंभात प्रदान करण्यात आला.

### देशभरातील शिक्षकांचा मानाचा सन्मान

या पुरस्कार समारंभात देशभरातील शिक्षण क्षेत्रातील प्राचार्य, समन्वयक (कोऑर्डिनेट र) आणि शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. विशेष म्हणजे, न्यू इंग्लिश मीडियम स्कूलच्या तिन्ही शिक्षकांचा समावेश या निवडक गुणवंतांमध्ये झाला, ही शाळेसाठी अभिमानाची बाब ठरली.

### शाळेत आनंदोत्सवाचे वातावरण

हा मानाचा सन्मान मिळाल्यानंतर न्यू इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळेचे अध्यक्ष शांताराम कळसकर, उपाध्यक्ष प्रकाश कवाद, सचिव वसंत कवाद, व्यवस्थापन प्रतिनिधी संगिता कवाद, तसेच सर्व संचालक मंडळ, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी प्राचार्य आणि शिक्षकांचे अभिनंदन केले.

### ‘‘वाचन आणि खेळ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची गुरुकिल्ली’’

आपल्या मनोगतात डॉ. किरण बेदी म्हणाल्या, ‘‘विद्यार्थ्यांनी वाचनाची सवय लावली पाहिजे. वाचनामुळे विचारशक्ती, निरीक्षण आणि आत्मविश्वास वाढतो.’’तर सायना नेहवाल यांनी सांगितले, ‘‘शिक्षणाबरोबरच खेळाची आवड जोपासली पाहिजे. खेळामुळे शरीर तंदुरुस्त राहते आणि मन प्रसन्न होते.’’

### ‘‘हे यश संपूर्ण शिक्षकवृत्तीचे आहे’’

पुरस्कारानंतर भावना व्यक्त करताना प्राचार्य डायस यांनी सांगितले, ‘‘हा सन्मान केवळ वैयक्तिक नाही, तर संपूर्ण शाळेच्या शिक्षकवृत्तीचा गौरव आहे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आम्ही सदैव वचनबद्ध राहू.’’

### किरण बेदी आणि सायना नेहवाल यांच्या हस्ते पुरस्कार वितरण

या समारंभात प्रमुख अतिथी म्हणून आयपीएस अधिकारी डॉ. किरण बेदी आणि पद्मभूषण पुरस्कार विजेत्या बॅडमिंटनपटू सायना नेहवाल उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते श्री. डायस, सौ. मोनिका आणि सौ. मीनाक्षी यांना सन्मानपूर्वक हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.इंडियन टॅलेंट ऑलिंपियाडचे चेअरमन सौ. मधुमती मसारकल आणि अध्यक्ष श्री. जगदीश मसारकल यांच्या मार्गदर्शनाखाली हा समारंभ आयोजित करण्यात आला होता.

# भाऊसाहेब पानमंद यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**| २९ वर्षांपासून इंग्रजी विषयात घडवले हजारो विद्यार्थी**
**| १०० टक्के निकालाची परंपरा कायम**

गोरेगाव : प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी, शिक्षक आघाडी कोकण विभाग आयोजित ‘वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार गुणगौरव सोहळा सोहळा रविवार, दि. ९ नोव्हेंबर रोजी ठाण्यात थाटामाटात पार पडला. या सोहळ्यात तालुक्यातील गोरेगावचे सुपुत्र आणि मुंबईतील शिक्षक भाऊसाहेब पानमंद यांना ‘‘वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार२०२५’’ देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार मा. ॲड. निरंजन डावखरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.




### अभिनंदनाचा वर्षाव

या सन्मानाबद्दल कै. अमरनाथ वामनराव पाटील शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व आमदार तुकाराम काते, शिक्षक आमदार कपिल पाटील, समाजसेवक भाऊ भापकर, शिक्षक भारतीचे कार्याध्यक्ष सुभाष मोरे, शाळेचे मुख्याध्यापक आप्पासाहेब धुमाळ आणि सेकंडरी स्कूल्स एम्प्लॉईज क्रेडिट सोसायटीचे संचालक भाऊसाहेब आहेर यांनी पानमंद यांचे अभिनंदन केले.

### शिक्षणसेवेतून समाज परिवर्तनाचा ध्यास

पानमंद सरांचे शिक्षणसेवेतील योगदान हे केवळ अध्यापनापुरते मर्यादित नसून सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव निर्माण करणारे आहे. विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, शिस्त आणि प्रामाणिकपणा यांचे संस्कार देणारे ते खरे अर्थाने ‘‘आदर्श शिक्षक’’ ठरले आहेत.त्यांच्या या सन्मानामुळे पारनेर तालुका आणि अहमदनगर जिल्ह्याचेही नाव शिक्षण क्षेत्रात उज्वल झाले आहे.

### विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रकाश टाकणारे शिक्षक

भाऊसाहेब पानमंद गेली तब्बल २९ वर्षे अमरनाथ हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, चेंबूर (मुंबई) येथे कार्यरत आहेत. इयत्ता ९ वी आणि १० वीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजीसारखा कठीण विषय त्यांनी सुलभ आणि रंजक पद्धतीने शिकवण्याचे कार्य केले आहे. झोपडपट्टीतील सर्वसामान्य कामगार कुटुंबातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देत त्यांनी शाळेचा १०० टक्के निकाल कायम राखण्याची परंपरा जपली आहे.

### अनेक पुरस्कारांनी गौरवलेले कार्य

पानमंद हे इंग्रजी विषयाच्या पुनर्रचित अभ्यासक्रमासाठी तज्ञ मार्गदर्शक म्हणून कार्यरत राहिले आहेत. तसेच वार्डस्तरीय विविध स्पर्धांमध्ये परीक्षक म्हणूनही त्यांनी योगदान दिले आहे. त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यासाठी त्यांना आधीच गुरु द्रोणाचार्य पुरस्कार, राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार, साने गुरुजी उपक्रमशील शिक्षक पुरस्कार, लायन्स क्लब आदर्श शिक्षक पुरस्कार, शिक्षक भारती-सावित्री फातिमा पुरस्कार यांसह अनेक सन्मानांनी गौरविण्यात आले आहे.

### उपस्थित मान्यवरांचा गौरवशाली सोहळा

या पुरस्कार सोहळ्याला महाराष्ट्र भाजपा प्रदेशाध्यक्ष व आमदार रवींद्र चव्हाण, आमदार संजय केळकर, डॉ. विनय सहस्त्रबुद्धे (अध्यक्ष, राज्य सांस्कृतिक धोरण अंमलबजावणी समिती), शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, आमदार निरंजन डावखरे आणि शिक्षणाधिकारी देविदास महाजन यांची उपस्थिती लाभली. ठाण्यातील तृप्ती बँक्वेट, एम. एच. हायस्कूल, शिवाजी पथ येथे झालेल्या या सोहळ्यात शिक्षक समाजाचा गौरवशाली क्षण साकार झाला.

# निघोजमधे हरिनाम सप्ताहाला भक्तीमय सुरुवात

**निघोजमध्ये गजर ‘विठ्ठल विठ्ठल जय हरि’चा | रामदास बाबा दुसाणे पुण्यस्मरणानिमित्त आयोजन**

निघोज : प्रतिनिधी

प्रेम, श्रद्धा आणि भक्तीचा संगम असलेल्या निघोज गावात रामदास बाबा दुसाणे यांच्या २० व्या पुण्यस्मरणानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाला सोमवारी (दि. १०) भक्तिभावाने प्रारंभ झाला. या धार्मिक सोहळ्याचे आयोजन रामदास बाबा दुसाणे दिंडी सोहळा व भाऊसाहेब कोल्हे मामा प्रतिष्ठान यांच्या वतीने करण्यात आले असून हा सप्ताह शुक्रवार (दि. १४) पर्यंत रंगणार आहे.



### विणापूजनाने झाला सप्ताहाचा शुभारंभ

सोमवारी सकाळी अकरा वाजता झालेल्या विणापूजन सोहळ्यास विविध मान्यवर उपस्थित होते. डॉ. भास्करराव शिरोळे (माजी पंचायत समिती सदस्य), बबुशा वरखडे (माजी उपसभापती, बाजार समिती), संतोषशेठ रसाळ (विश्वस्त, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट), देवरामबुवा लामखडे, कचरदास महाराज वरखडे, सोमनाथ वरखडे (कपिलेश्वर उद्योग समूह), विलासराव हारदे, रंगनाथ ढवण, आप्पासाहेब लामखडे आणि बाळूकाका देशपांडे यांच्या हस्ते विणापूजन संपन्न झाले. यानंतर भाऊसाहेब कोल्हे मामा व चंद्रकला कोल्हे यांच्या हस्ते रामदास बाबा दुसाणे यांच्या पर्णकुटीत पूजन व महाआरती करण्यात आली. वातावरणात हरिनामाचा गजर आणि टाळमृदुंगाच्या नादाने भक्तिभावाचे साम्राज्य पसरले.

### प्रवचनांची रसधारा

या अखंड हरिनाम सप्ताहात दररोज प्रसिद्ध कीर्तनकार आणि प्रवचनकार आपले कीर्तन व विचारमंथन करणार आहेत. यात पोपटकाका देशपांडे, विठ्ठल विठ्ठल महाराज भुकन, कचरु महाराज वरखडे, पोपट महाराज तनपुरे आदींचा सहभाग राहणार आहे. सप्ताहाचा समारोप शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत नवनाथ महाराज माशेरे यांच्या काल्याच्या कीर्तनाने होईल. त्यानंतर सर्व भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

### श्रद्धा, संस्कार आणि भक्तीचा उत्सव

गेल्या दोन दशकांपासून सुरू असलेला हा सप्ताह आता निघोज आणि परिसरातील जनतेसाठी एक अखंड श्रद्धेचा उत्सव बनला आहे. विठ्ठल नामाच्या गजरात, दिंडीच्या तालावर आणि अभंगांच्या स्वरांत रामदास बाबा दुसाणे यांचे पुण्यस्मरण गावकऱ्यांच्या अंत:करणात जिवंत राहिले आहे.

### ‘‘रामदास बाबांच्या आशीर्वादानेच आजचा वारसा टिकून आहे’’

विणापूजन प्रसंगी बोलताना डॉ. भास्करराव शिरोळे म्हणाले, ‘‘गेली वीस वर्षे भाऊसाहेब कोल्हे मामा यांनी रामदास बाबा दुसाणे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त हरिनाम सप्ताहाची परंपरा सुरू ठेवली आहे. बाबांनी या ठिकाणी दहा-बारा वर्षे वास्तव्य केले आणि कोल्हे कुटुंबीयांनी त्यांची अपार सेवा केली. आज या सेवाभावाच्या बीजातूनच या भूमीत अध्यात्म, श्रद्धा आणि समृद्धी फुलली आहे.’’ त्यांनी पुढे सांगितले की, कोल्हे मामा व त्यांच्या सहकाऱ्यांचे कार्य धार्मिक संस्कृती आणि सामूहिक भक्तीच्या जपणुकीसाठी प्रेरणादायी आहे.

# समर्थ शैक्षणिक संकुलात देशभक्तीचा अविष्कार

**वंदे मातरम गीतनिर्मिती शतकोत्तर सुवर्ण महोत्सव**

कर्जुले हर्या: प्रतिनिधी

समर्थ शैक्षणिक संकुल, बेल्हे येथे बंकिमचंद्र चटर्जी यांनी रचलेल्या ‘वंदे मातरम’ या अमर गीताच्या निर्मितीला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर ‘वंदे मातरम गीतनिर्मिती शतकोत्तर सुवर्ण महोत्सवा’ निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. देशभक्ती, एकता आणि मातृभूमीविषयी असलेली मूल्यं नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा हेतू या उपक्रमामागे असून, संपूर्ण संकुलात देशभक्तीचा माहोल निर्माण झाला होता.



### एकता आणि त्यागाचा संदेश’

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून राबवण्यात आलेल्या या उपक्रमात देशभक्ती, एकता आणि राष्ट्रसेवेची भावना विद्यार्थ्यांत रुजवण्यासाठी सामूहिक ‘वंदे मातरम’ गायनाचे आयोजन करण्यात आले. इंजिनीअरिंग, पॉलिटेक्निक, बीसीएस, आयटीआय, एमबीए, फार्मसी, लॉ, गुरुकुल आणि कनिष्ठ महाविद्यालय अशा सर्व विभागांतील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### देशभक्तीच्या स्वरांनी दुमदुमले समर्थ संकुल

या सर्व उपक्रमांतून विद्यार्थ्यांनी देशाविषयी निष्ठा, अभिमान आणि एकतेचा संदेश देत ‘‘वंदे मातरम’’चे स्वर आकाशात घुमवले. संपूर्ण संकुलात राष्ट्रभक्तीचा उत्सव रंगला आणि विद्यार्थ्यांच्या सहभागातून ‘‘एक भारत- श्रेष्ठ भारत’’ ची भावना उजळून निघाली.

### स्पर्धांमधून उलगडली सृजनशील देशभक्ती

या निमित्ताने रांगोळी स्पर्धा, गीतगायन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध लेखन व पोस्टर मेकिंग अशा विविध उपक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. प्रत्येक स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सृजनशीलतेच्या माध्यमातून मातृभूमीविषयी अभिमान आणि निष्ठा व्यक्त केली.

### ‘‘विद्यार्थ्यांनी घ्यावी राष्ट्रहिताची जबाबदारी’’

कार्यक्रमाला संबोधित करताना संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके म्हणाले, ‘‘जनमानसात देशभावना जागृत करण्यामध्ये ‘वंदे मातरम’ गीताचे योगदान अफाट आहे. राष्ट्रहिताच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी आपल्या कार्यातून देशप्रेमाचा प्रचार व प्रसार करावा.’’

### मान्यवरांची उपस्थिती

कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊली शेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत तसेच सर्व विभागांचे प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

‘पारनेर दर्शन’ हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून ‘पारनेर दर्शन’ कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com